IO

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १) 284

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** बेगमपुरा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0217 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/08/2024 01:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 19/08/2024
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/08/2024
**Time From (वेळेपासून):** 13:50 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 20/08/2024 **Time (वेळ):** 01:48 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/08/2024 01:48 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** मिल कॉर्नर जवळील ईआरएस , कोचिंग क्लासेस मध्ये,छत्रपती संभाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): वजीसखाँ युनुसखाँ पठाण

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1990

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | घर नं 10/20, गल्ली नं 19, ,इंदिरानगर, बायजीपुरा,छत्रपती संभाजीनगर, बेगमपूरा,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मेन रोड बदनापुर,ताबदनापुर,जि जालना,बदनापूर,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9325756052

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | डॉ.एराज सिद्दीकी | | | 1. सफरोज पार्क च्या जवळ,,गट नं62, पडेगाव,छत्रपती संभाजीनगर,,बेगमपूरा,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | शेख उमर शेख गणी | | | 1. कोहीनुर कलनी, मुगलपुरा,, पवनचक्की ,छत्रपती संभाजीनगर, ,बेगमपूरा, औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |



Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | ड. सिद्दीकी मोहम्मद फैसोद्दीन ऊर्फ समीर मोहम्मद रियाजुद्दीन | | | 1. सफरोज पार्क च्या जवळ,,गट नं62, पडेगाव ,छत्रपती संभाजीनगर,,बेगमपूरा,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 4 | सिद्दीकी फराज मोहम्मद रियाजुद्दीन | | | 1. सफरोज पार्क च्या जवळ,गट नं62, पडेगाव,छत्रपती संभाजीनगर,बेगमपूरा,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची रक्कम अॅन्थ्रासिन पावडर लागलेली | 50,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

50,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद मी वजीसखा इनुरखा पठाण वय 34 वर्ष, व्यवसाय - शिक्षण, सध्या रा. घर नं.10/20, गल्ली नंबर 19 इंदिरानगर बायजीपुरा संभाजीनगर ता.जि. संभाजीनगर. मुळ रा. मेन रोड बदनापुर ता.बदनापुर जि. जालना. मोबाईल नंबर 9325756052. इमेल आयडी wajispathan@gmail.com

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, दिनांक-22.07.2024 रोजी मी अॅन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयात दोन शासकीय पंचासमक्ष पोलीस निरीक्षक, श्री.मुटकेर यांचेकडे लेखी तक्रार दिली होती की,माझी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ छ.संभाजीनगर येथे ग्रंथालय व माहीती शास्त्र या विषयामध्ये विदयावाचस्पती ( Ph. D ) या पदवीसाठी संशोधन करत आहे. मी ग्रंथालय व माहीती शास्त्र या विषयामध्ये विदयावाचस्पती ( Ph.D ) चा अभ्यास करत असल्यामुळे महाराष्ट्र शासनाचे महात्मा जोतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था ( महाज्योती ) नागपुर यांचे कडून मला अधिछात्र वृत्ती ( फेलोशिप ) दिनांक 13.12.2022 रोजी मंजुर झालेली आहे.
मी ग्रंथालय व माहीती शास्त्र या विषयाचे संशोधन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ छत्रपती संभाजीनगर येथील ग्रंथालय व माहीती शास्त्र संशोधन केद्रात करत आहे. मला संशोधनासाठी संशोधक मार्गदर्शक ( गाईड ) म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडुन डॉ. रफिक झकेरीया महीला महाविदयालय नवखंडा, छत्रपती संभाजीनगर येथील ग्रंथपाल श्रीमती डॉ. सिद्दीकी एराज यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. मला महाराष्ट्र शासनाकडुन संशोधनासाठी प्रति महीना 50,400/- रुपये अधिछात्रवृत्ती ( फेलोशिप ) मिळत आहे. सदरची अधिछात्रवृत्ती (फेलोशिप ) मिळविण्यासाठी मला महाराष्ट्र शासनाचे महात्मा जोतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था ( महाज्योती ) या संस्थेचे प्रोग्रेस रिपोर्ट, स्वयंघोषणापत्र, हजेरी पत्रक, HRA प्रमाणपत्र, Fellowship Utilization Certificate , Tree Month Continution Certificate ,Half Yearly Progress Report इत्यादी कागदपत्र सादर करावी लागतात. सदर कागदपत्रावरती माझे संशोधक मार्गदर्शक ( गाईड ) श्रीमती डॉ. सिद्दीकी एराज यांची सही घेवुन सदरची कागदपत्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ येथे दाखल करावी लागतात. त्यानंतर त्या ठिकाणी सदर



Scanned with OKEN Scanner

कागदपत्रावरती विदयापीठातील ग्रंथालय व माहीती शास्त्र प्रमुख श्रीमती वैशाली खापरडे मॅडम आणि विदयापीठाचे रजिस्टार ( प्रबंधक ) हे सही करतात.

दिनांक 02.02.2024 रोजी मी माझे महाज्योती या संस्थेचे प्रोगेस रिपोर्ट, स्वयंघाषणापत्र, हजेरी पत्रक, HRA प्रमाणपत्र, Fellowship Utilization Certificate , Tree Month Continution Certificate , Half Yearly Progress Report इत्यादी कागदपत्र घेवुन त्यावरती माझे संशोधक मार्गदर्शक ( गाईड ) श्रीमती डॉ. सिद्दीकी एराज यांची सही घेण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी मला माझे संशोधक मार्गदर्शक ( गाईड ) श्रीमती डॉ. सिद्दीकी एराज यांनी मी तुमच्या कागदपत्रावरती सहया करते तसेच तुमचा RAC रिपोर्ट पॉझिटिव्ह देते, तसेच तुमचे ph.D संशोधनाचे प्रबंधाचे प्रकरण 1 व प्रकरण 2 तपासुन मंजुरी देण्यासाठी तसेच यापुढे तुम्ही दाखल करणारे संशोधनाचे प्रबंधाची तपासणी करुन त्यांची अंतिम मंजुरी देण्यासाठी आणी तुमची ph.D पुर्ण होईपर्यत तुम्हाला आवश्यक असलेली सर्व मदत करण्यारासाठी मी तुमची संशोधन मार्गदर्शक ( गाईड ) म्हणुन मी तुमची मदत करेल. त्यासाठी तुम्हाला मला तुमची अधिछात्रवृत्ती ( फेलोशिप ) सुरु झालेल्या नोव्हेंबर 2022 पासुन ते तुमचे ph.D चे शिक्षण पुर्ण होईपावेतो नोव्हेंबर 2026 रोजी पर्यत तुम्हाला मिळणारे अधिछात्रवृत्तीचे ( फेलोशिपचे ) पैशामधुन मला प्रत्येक महीण्याचे 10,000/- रुपये प्रमाणे तुमचे ph.D चे शिक्षण पुर्ण होईपावेतोचे एकुण 5,00,000/- रुपये दयावे लागतील. तसेच विदयापीठीत होणा-या तुमच्या सहा महिण्याचा संशोधन अहवालाबाबत घेण्यात येणा-या RAC मिटिंगच्या वेळी मला विदयापीठात येण्या जाण्यासाठी तुम्हाला स्वखर्चाने चारचाकी गाडी दयावी लागेल व RAC मिटिंगच्या वेळी नाष्टयाची व जेवनाची तुमच्या स्वखर्चाने सोय करावी लागेल. तुम्ही जर मी सांगेल त्या प्रमाणे माझे ऐकले नाही तर मी तुमची ph.D पुर्ण होउन देणार नाही असे मला म्हणाल्या. त्यावेळी मी श्रीमती डॉ. सिद्दीकी एराज यांना सध्या माझेकडे पैसे नाहीत. अधिछात्रवृत्तीचे ( फेलोशिपचे ) पैसे आल्यावरती मी पैसे देतो असे म्हणालो होतो. तसेच डॉ. रफिक झकेरीया महीला महाविदयालय नवखंडा, छत्रपती संभाजीनगर येथील ग्रंथपाल सहाय्यक श्री. उमर शेख यांनी मला मॅडम जर तुमच्या कागदपत्रावरती सहया करत नसतील तर मला 25,000/- रुपये दे मी त्यांच्या सहया घेवुन तुम्हाला कागदपत्र देतो असे म्हणाले होते. त्यावेळी मी त्यांना सध्या माझ्याकडे पैसे नाहीत असे म्हणालो होतो.

त्यानंतर मी 1 जुन 2024 रोजी माझे भावाचे लग्नाची लग्न पत्रिका श्रीमती डॉ. सिद्दीकी एराज यांना देण्यासाठी त्यांचे घरी गेलो होतो. त्यावेळी श्रीमती डॉ. सिद्दीकी एराज यांनी मला तुमच्या अधिछात्रवृत्तीचे ( फेलोशिपचे ) पैसे आले आहेत का असे विचारले त्यावेळी मी माझे जानेवारी 2024 ते जुन 2024 चे बील सबमीट झाल्यानंतर मी तुम्हाला पैसे देतो असे सांगीतले होते. त्यावेळी श्रीमती डॉ. सिद्दीकी एराज यांनी तुझे जानेवारी 2024 ते जुन 2024 या महीण्याचे 8880 प्रगती अहवाल व इतर कागदपत्र, बील सबमिट करताना मला नोव्हेंबर 2022 पासुन ते नोव्हेंबर 2026 सालापर्यंतचे प्रति महीना 10,000/- रुपये प्रमाणे असे एकुण 5,00,000/- रुपये होतात ते तुम्ही तुमच्याकडे अधिछात्रवृत्तीचे ( फेलोशिपचे ) पैसे आल्यानंतर मला दया असे म्हणाल्या होत्या. तसेच मला भेटण्यासाठी येताना तुम्ही एकटेच येउन भेटा तुमच्या सोबत इतर दुस-या कोणालाही घेवुन येवु नका. तुम्ही जर पैसे मला दिले नाहीत तर मी मात्र तुमच्या संशोधन प्रगती अहवालावरती स्वाक्षरी करणार नाही व तुमचा RAC रिपोर्ट व तुम्ही दाखल करणारे संशोधन अहवालाचे पॉझिटिव्ह रिपोर्ट देणार नाही असे म्हणाल्या. मला माहीत आहे की, माझे संशोधक मार्गदर्शक ( गाईड ) श्रीमती डॉ. सिद्दीकी एराज या माझ्या अधिछात्रवृत्तीचे ( फेलोशिपचे ) पैशातुन माझ्याकडे मागत असलेले प्रती महीना 10,000/- रुपये प्रमाणेचे पैसे ही कोणतीही शासकीय फी नसुन ती लाचेची रक्कम आहे. माझ्यामध्ये व माझे संशोधक मार्गदर्शक ( गाईड ) श्रीमती डॉ. सिद्दीकी एराज, ग्रंथपाल सहाय्यक श्री. उमर शेख यांच्या मध्ये कोणत्याही प्रकारचा पैशाचा आर्थिक व्यवहार झालेला नाही अथवा आमच्या मध्ये कोणताही वाद विवाद नाही.

तरी आज दिनांक 22.07.2024 रोजी मी माझे महाज्योती या संस्थेचे प्रोगेस रिपोर्ट, स्वयंघाषणापत्र, हजेरी पत्रक, HRA प्रमाणपत्र, Fellowship Utilization Certificate, Tree Month Continution Certificate , Half Yearly Progress Report इत्यादी कागदपत्र घेवुन त्यावरती माझे संशोधक मार्गदर्शक ( गाईड ) श्रीमती डॉ. सिद्दीकी एराज यांची सही घेण्यासाठी त्यांना डॉ.रफिक झकेरीया महीला महाविदयालय नवखंडा , छत्रपती संभाजीनगर येथे भेटणार आहे. त्यावेळी मला श्रीमती डॉ. सिद्दीकी एराज अथवा ग्रंथपाल सहाय्यक श्री. उमर शेख यांनी स्वता अथवा इतरामार्फत पैशाची मागणी केल्यास त्यांचेवरती कायदेशीर कारवाई करण्यात यावी म्हणुन त्यांचे विरुध्द माझी तक्रार आहे.

अशी लेखी तक्रार दिली. त्यासोबत मी, माझी Ph.D करीता निवड झालेल्या आदेशाची छायांकित प्रत, Provisional Research Appoval Letter छायांकीत प्रत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापिठाकडुन श्रीमती सिद्दीकी एराज, यांना रिसर्च गाईड म्हणुन नियुक्ती केल्याची छायांकीत प्रत, डॉ.बाबासाहेब



Scanned with OKEN Scanner

आंबडेकर मराठवाडा विद्यापीठाकडुन संशोधन प्रकल्पास मान्यता दिल्याचे प्रमाणपत्राची छायांकीत प्रत, तसेच प्रोजेक्ट मॅनेजर महात्मा ज्योतीबा फुले रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिटयुट ( महाज्योती ) डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन अंबाझरी रोड नागपुर यांना दिनांक 07.02.2024 रोजी पाठविलेल्या बीलाचे कागदपत्रांची छायांकीत प्रती दिल्या.

त्यानंतर मी दिलेली तक्रार खरी आहे काय ? याची खात्री व पडताळणी करण्यासाठी माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर देवून मला पंच क्र. 01 श्री. डहाळे यांचे सोबत ग्रंथपाल श्रीमती डॉ. सिद्दीकी व ग्रंथपाल सहायक श्री.उमर शेख यांची भेट घेण्यास पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यानंतर  पोलीस निरीक्षक मुटेकर साहेब हे त्यांच्या पथकासह व सर्व साहीत्यासह शासकीय वाहनाने व मी माझी मोटार सायकलने असे आम्ही सर्वजण ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय जालना येथून निघून  छत्रपती संभाजीनगर येथील कर्णिका देवी मंदीराच्या यात्रेच्या मैदानावर गेलो. त्याठिकाणी पोहचल्यानंतर मला पंचांना लाच मागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना दिल्या.

त्यानंतर माझ्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी पोलीस निरीक्षक श्री.मुटेकर यांनी सोबत आणलेल्या साहीत्यातून एक नवीन मेमरी कार्ड काढुन डीजीटल व्हाईस रेकॉर्डर मशिन मध्ये टाकले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डीग चालु करुन व्हाईस रेकॉर्डीग मशिन कोणालाही दिसणार नाही अशा रितीने माझ्या बनियनला आतील बाजुस बांधली. त्यानंतर मी व पंच क्र. 01 श्री. डहाळे  असे आम्ही दोघे जण माझ्या मोटार सायकलने डॉ.रफिक झकारीया महिला महाविद्यालय नवखंडा, छत्रपती संभाजीनगर येथे गेलो. त्या ठिकाणी  मी ग्रंथपाल डॉ.सिद्दीकी एराज यांना व सहायक ग्रंथपाल उमर शेख यांना भेटलो. त्यावेळी मी पंचासमक्ष माझ्या पी.एच.डी चे अभ्यासाचे दाखल केलेल्या कागदपत्राबाबत तसेच प्रोग्रेस रिपोर्ट बाबत ग्रंथपाल डॉ.सिद्दीकी एराज यांना बोललो असता त्यांनी मला बुध के दिन आजा ओ असे म्हणून त्यांनी  मला बुधवारी भेटण्यास बोलावले. म्हणून त्या दिवशी कारवाई स्थगित करुन तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला.

त्यावरुन पुन्हा दिनांक 24.07.2024 रोजी बुधवारी डॉ. रफिक झकेरीया महीला महाविदयालय नवखंडा, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी मला पंच क्र. 01 श्री. डहाळे यांचे समक्ष गंथ्रपाल सहाय्यक श्री.उमर शेख यांनी कागदपत्राचे फाईल वरती ग्रंथपाल श्रीमती डॉ.सिद्दीकी एराज यांची सही घेवून येण्यासाठी ला दे पच्चीस हजार रुपये महीना.. मॅम की साईन लेके आता हु तुम्हारे को असे म्हणुन मला 25,000/- रुपयाची लाचेची मागणी केली. त्या दिवशी ग्रंथपाल श्रीमती डॉ. सिद्दीकी एराज या कॉलेजला आलेल्या नसल्यामुळे त्यांची लाचमागणी बाबत पडताळणी करता आली नव्हती. म्हणून त्या दिवशी कारवाई स्थगित करुन तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर  दिनांक 25.07.2024 रोजी लाच मागणी पडताळणी केली असता मी पंच क्र. 01 श्री. डहाळे यांचे समक्ष डॉ. रफिक झकारीया कॉलेज मधील ग्रंथालयात सिद्दीकी मॅडम यांना भेटलो. त्यावेळी ग्रंथपाल श्रीमती डॉ. एराज सिद्दीकी यांनी त्यांचे उजव्या हाताचा अंगठा व त्याचे जवळील बोट एकमेकांवरती घासून ये कब तक कर रहे है तुम असे म्हणाल्या. त्याच वेळी सदर ग्रंथालयातील प्युन अफसरभाई आल्याने ग्रंथपाल डॉ. एराज सिद्दीकी यांनी तोंडावर बोट ठेवून इशाऱ्याने मला परत भेटण्यासाठी येण्याचे सांगीतले होते. तसा पंचनामा करण्यात आला आहे.

दिनांक 27.07.2024 रोजी डॉ. बाबासाहेब आंबडेकर मराठवाडा विद्यापीठामध्ये मला माझे संशोधनाबाबत सल्ला देण्यासाठी संशोधन सल्लागार समितीची (RAC) ची बैठक आयोजीत केली होती. त्यावेळी सदर संशोधन सल्लागार समितीची ( RAC )  च्या बैठकीस येण्यासाठी माझे संशोधन मार्गदर्शक ( गाईड ) डॉ. श्रीमती सिद्दीकी एराज यांनी मला त्यांना RAC मिटिंग करीता जाण्यासाठी चारचाकी वाहनाची व्यवस्था करण्यास सांगीतले होते. त्यानुसार मी दिनांक 27.07.2024 रोजी माझे संशोधन मार्गदर्शक ( गाईड ) डॉ. श्रीमती सिद्दीकी एराज यांचे सांगणे प्रमाणे RAC मिटिंग करीता जाण्यासाठी श्री. शितेश भिमराव वाघ यांची MH-20-GC-0505 या क्रमांकाची इन्व्होवा कार 3500 रुपये किरया देवुन भाडयाने केली.

टिप- (सदरचा गुन्हायाचा जबाब मोठा असल्या कारणामुळे या मध्ये बसत नाही तरी त्या जबाबाची प्रत सोबत जोडत आहे.)



Scanned with OKEN Scanner

13. **Action taken:** Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
MANGESH NANDKUMAR JAGTAP(I (Inspector)) / 14901000362MNJM8101X

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद): No.(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अम्मलदार
पोलीस स्टेशन,बेगमपुरा
छत्रपती संभाजीनगर (शहर)

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): MANGESH NANDKUI
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): 14901000362MNJM810



Scanned with OKEN Scanner